चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
११ मे., २०१९
☎ : 07172-264300
📠: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही
# ०४ आरोपीस ११ लक्ष १८ हजाराचा मुदद्देमाल हस्तगत

दिनांक ०८/०५/२०१९ आणि ०९/०५/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात चंद्रपुर शहरात वेगवेगळया ठिकाणी नाकेबंदी आणि छापा टाकुन ११ लक्ष १८ हजार २०० रू चा मुदद्देमाल हस्तगत केला असुन ०४ आरोपींना जेरबंद केले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीवरून चंद्रपुर नागपुर रोडवर नाकेबंदी लावुन वाहनाची तपासणी दरम्यान एका हुदांई वरना क्र. एम. ए. ४० ए.बी. ६७३९ वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये नंबरवन कंपनीच्या ३६० निपा, ऑफीसर चॉईस कपंनीच्या ९६ निपा असा एकुण चारचाकी वाहनासह ६,८६,८००/–रू चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयात ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला आहे.

दुसरीकडे फुकटनगर येथे एका घरी अवैध दारू असल्याबाबत माहिती मिळाल्याने त्याठिकाणी छापा टाकला असता दोन इसमांच्या ताब्यात देशी दारूच्या १००० निपा किं. १,००,०००/–रू, आणि नगदी रू. ४६,४००/–, व एक मोबाईल फोन असा एकुण १,४७,४००/–रू चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयात दोन आरोपीस अटक करण्यात आले असुन पोलीस स्टेशन रामनगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच पोलीस स्टेशन रामनगर परिसरातील फॉरेस्ट कार्यालयासमोरील रोडवर नाकेबंदी लावुन, संशयावरून एका सॅन्ट्रो चारचाकी वाहनाची तपासणी केली असता, वाहनामध्ये देशी दारूच्या ८०० निपा एक चारचाकी वाहन आणि मोबाईल फोन असा एकुण २,८४,०००/–रू चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयात ०१ आरोपीस अटक करण्यात आली असुन पोलीस स्टेशन रामनगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेडडी यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात पोउपनि. जावेद शेख, सफौ. पंडित वऱ्हाटे, दौलत चालखुरे, पद्माकर भोयर, पोहवा. महेंद्र भुजाडे, पोशि. जमिर खान, अनुप डांगे, मिलींद, चंदु नागरे, कुंदन बावरी, प्रफुल मेश्राम, प्रांजल झिल्पे, जावेद सिददीकी, अमोल धंदरे, रविंद्र बोरकर, मनोज रामटेके, रविंद्र पंधरे यांनी पार पाडली.

---

# फिर्यादीवर धारदार शस्त्राने हल्ला करणाऱ्या आरोपीस १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन रामनगर येथे फिर्यादीव धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर दुखापत करणाऱ्या आरोपीस १०/०५/२०१९ रोजी **श्री. जोशी. जिल्हा सत्र न्यायाधीश क्र. ०३, चंद्रपुर यांनी १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.**

पोलीस स्टेशन रामनगर अंतर्गत श्यामनगर चंद्रपुर येथे दिनांक ०८/०६/२०१६ रोजी यातील फिर्यादी नामे आनंद ज्ञानेश्वर दरेकर वय २५ रा. श्यामनगर चंद्रपुर हा आपल्या मित्रासोबत बोलत असतांना, **आरोपी नामे नितेश नामदेव ठाकरे वय २५ रा. श्यामनगर चंद्रपुर** याने जुन्या वादावरून फिर्यादीस धारदार शस्त्राने शरीरावर वार करून गंभीर जखमी करून जिवानिशी ठार करण्याच्या प्रयत्न केला. अशा फिर्यादीच्या आणि मेडिकल रिपोर्टवरू पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. ६२७/२०१६ कलम ३०७, ५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि. दिवाकर रामटेके, पोस्टे रामनगर यांनी पुर्ण करून आरोपी विरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १०/०५/२०१९ रोजी **आरोपी नामे नितेश नामदेव ठाकरे वय २५ रा. श्यामनगर चंद्रपुर यास कलम ३०७ भादंवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व ३,०००/—रू, दंड, न भरल्यास ३ महिने शिक्षा, कलम ५०६ भादंवि मध्ये ३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा १,०००/—रू दंड, न भरल्यास ०१ महिना कारावासाची शिक्षा श्री. जोशी. जिल्हा सत्र न्यायाधीश क्र. ०३, चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणात सरकार तर्फे **ॲड. स्वाती देशपांडे, सरकारी अभियोक्ता, तर कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा राजु सबळ, पोस्टे रामनगर** यांनी काम पाहिले.

---